ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

Volume–IX, Issue– IV July – August 2022

Original Research Article

# माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा भौगोलिक चलांच्या संदर्भात अभ्यास

* श्रीमती प्रतिभा उरसळ व ** डॉ.चेतन चव्हाण

*सहाय्यक प्राध्यापक, पी.व्ही.डी.टी.महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय ,एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

** पी.एच.डी गाईड,गोखले शिक्षण संस्थेचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय व संशोधन केंद्र, परेल, मुंबई

**सारांश:**

संबंधित अभ्यास हा माध्यमिक शाळेतील शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी व त्याच्या भौगोलिक चलांमधील संबंध पाहण्यासाठी हाती घेण्यात आला. संशोधनासाठी यादृच्छिक नमुना निवडीद्वारे १११ शिक्षणाची निवड करण्यात आली. त्यामध्ये ५८ पुरुष शिक्षक आणि ५३ महिला शिक्षिकांची निवड करण्यात आली. वरील शिक्षक हे बृहन्मुबंईतील शासकीय व खाजगी माध्यमिक विद्यालयामध्ये कार्यरत आहेत. सामग्री संकलनासाठी डॉ. रविंद्र कौर, सरबजीत कौररानू आणि सरबजीतकौर ब्रार यांची व्यावसायिक बांधिलकी प्रश्नावली (२०११) उपयोगात आणली गेली. सामग्री विश्लेषणासाठी मध्यमान, प्रमाणविचलन आणि ‘t‘ परिक्षिका यांचा वापर केला गेला. संबंधित अभ्यासाची फलिते खालीलप्रमाणे.....

१) पुरुष आणि स्त्री माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी मध्ये फरक आढळून आला.

२) १० वर्षापेक्षा कमी अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी आणि १० वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी यामध्ये लक्षणीय फरक आढळून आला नाही.

३) शासकीय व खाजगी शाळांतील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी मध्ये फरक आढळून आला. म्हणून शैक्षणिक संस्थाच्या प्रमुखांची जबाबदारी आहे की त्यांनी शैक्षणिक संस्थामध्ये खेळीमेळीचे वातावरण निर्माण करावे, सुयोग्य संसाधनाचा पुरवठा करावा, योग्य तो संबंध सहकाऱ्यांशी प्रभावीपणे स्थापन करुन त्यांचा आदर व काळजी घ्यावी. शिक्षकांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी विविध शैक्षणिक कार्यकम उदा. कृतिसत्रे, चर्चासत्रे आयोजित करावीत तसेच तज्ञांसोबत आंतरक्रिया घडवून आणावी.

**बीज शब्द** - व्यावसायिक बांधिलकी, लिंग, कामाचा अनुभव आणि शाळेचा प्रकार इ.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

**प्रस्तावना:**

अध्यापना हा एक उदात्त व्यवसाय आहे. जर एखादा शिक्षक आपल्या व्यवसायाशी वचनबद्ध असेल तर तो व्यावसायिक असेल. शिक्षकांची व्यवसायिक बांधिलकी ही आधुनिक समाजाची गरज बनली आहे. शिक्षण प्रक्रिया ही उत्पन्नाचा दर आणि राष्ट्रीय विकासाशी संबंधित आहे. राष्ट्रीय उत्पन्नाचा दर आणि राष्ट्रीय प्रगतीचा आलेख वाढविण्यासाठी शिक्षण प्रक्रिया महत्वपूर्ण भूमिका बजावते. परंतु ही प्रक्रिया समार्पित शिक्षकांवर अवलंबून असते. जर शिक्षक प्रभावीपणे आणि उत्कृष्टपणे कार्य करत असतील तर निश्चितच राष्ट्रांचे भवितव्य उज्ज्वल असेल. म्हणूनच एकूण शिक्षण प्रक्रियेमध्ये शिक्षकांच्या गरजा किंवा प्राथमिकता अधिक महत्वपूर्ण आहेत.

बांधिलकी ही शिक्षकांचे सर्वात आवश्यक वैशिष्ट्य आहे. ही संज्ञा विविध प्रकारे शिक्षकांच्या वर्तनाचे व संस्थात्मक बांधिलकीच्या परिणामांपेक्षा विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी वापरली जाऊ शकते. शिक्षकांचे कार्य केवळ वर्गापुरते मर्यादित नाही. तर त्याचे कार्य शाळा आणि शैक्षणिक प्रणालींसारख्या संघटनांच्या संरचना आणि वातावरणात केले जाते. मेयर आणि ॲलेन (१९९१) च्या मते सकारात्मक संस्थात्मक पैलू, सातत्यता आणि (मूलभूत) निदर्कशात्मक बांधिलकीच्या संदर्भात व्यावसायिक बांधिलकीची चर्चा होवू शकते.

अध्यापन हा व्यवसाय एक अनोखा, वेगळाच व्यवसाय आहे. या व्यवसायामध्ये केवळ संस्थेशीच संबंध येत नसून इतर सहभागी व्यक्ती म्हणजेच पालक, विद्यार्थी आणि सहकारी यांचा संबंध येतो. म्हणूनच शिक्षक आणि शैक्षणिक प्रणाली या दोघांसाठी व्यावसायिक बांधिलकी मनापासून प्रेरक आहे. आर्य (२०१२) या नुसार शिक्षकाचा महत्वाचा वेळ हा त्यांच्या बांधिलकीला देवून समर्पित होणे म्हणजेच व्यावयायिक बांधिलकी किंवा कटिबद्धता होय.

डेव्ह (१९९८) याने शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीसाठीची पाच क्षेत्रे नमूद केली आहेत ती म्हणजे : १. अध्ययन कर्त्याशी बांधिलकी, २. समाजाशी, बांधिलकी ३. व्यवसायाशी बांधिलकी,

४. उत्कृष्टता प्राप्त करण्याची बांधिलकी, ५. मुलभूत मानवी मूल्यांची बांधिलकी.

शिक्षकांवरील विविध मागण्यांमुळे त्याची भूमिका क्लिष्ठ होत आहे. सध्याच्या शैक्षणिक परिवर्तनाच्या वेळापत्रकात यशस्वी होण्यासाठी शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकिचे स्तर महत्वपूर्ण आहेत. शिक्षण प्रणालीमधील उत्पादकता वाढविण्यासाठी पुनरावृत्ती कमी करणे, नापासांचे प्रमाण कमी करणे व शिक्षणची गुणवत्ता वाढविणे ही काळाची गरज आहे. शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी तपासण्यासाठी काही अभ्यास करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या चारित्र्याचा आकार घडविण्यास शिक्षक महत्वपूर्ण भूमिका बजावतात. वर्गामध्ये शिक्षकांचे व्यक्तिमत्व हे विद्यार्थ्यांचे चारित्र्य सुधारण्यास  महत्वपूर्ण भूमिका बजावते. शिक्षकांचा प्रभाव हा केवळ तिला किंवा त्याला काय माहित आहे किंवा काय येते हा नसून तो किंवा ती काय आहे यावर होत असतो.

व्यक्तिमत्व हा शब्द ग्रीक कलाकारांनी अभिनय करताना परिधान केलेला ‘‘मुखवटा‘‘ या लॅटिन शब्दापासून बनलेला आहे. आधुनिक शब्दांपासून व्याक्तिमत्वाचा अर्थ घेतलेला नाही. अशा प्रकारे व्यक्तिमत्व ही निश्चित अवस्था नसून एक गतिशिल संपूर्णता असते. जे पर्यावरणाशी संवाद साधल्याने सतत बदलत असते. प्रत्येक व्यक्तिचे व्यक्तिमत्व हे आचार-विचार, वर्तन, क्रियाकलाप आणि हालचाली यावरुन ओळखले जाते. बाह्य वातावरणासह एखादी व्यक्ती कशी जुळवून घेते ते म्हणजे व्यक्तिमत्व. जर शिक्षक त्यांच्या कामात असमाधानी असतील, त्यांचे संघटनात्मक अभाव असेल तर शिक्षकांबरोबरच त्यांच्या विद्यार्थ्यांनाही त्रास होईल.

**संबंधित साहित्याचा आढावा :**

सामूहिकरीत्या एकत्रित कार्य केलेल्या संस्थामधील पूर्वीच्या संशोधकांनी केलेले कार्य म्हणजे साहित्य होय. कोणत्याही संशोधनाची सुरुवात ही नियोजनबद्ध संबंधित साहित्याच्या पुनरालोकनातून होते. संशोधन प्रकियेचा हा एक भाग असून विविध कल्पना निर्माण करणे, संशोधनाचे महत्वपूर्ण प्रश्न तयार करण्यास मदत करते त्याचप्रमाणे संशोधनाचा आराखडा तयार करण्यास मदत करते.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

पॅन (२०१६) यांनी केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की महिला शिक्षक या त्यांच्या पुरुष सहकारापेक्षा अधिक वचनबद्ध आहेत. तसेच कमी अनुभव असलेले माध्यमिक शिक्षक अधिक अनुभव असलेल्या शिक्षकांपेक्षा अधिक वचनबद्ध आहेत.

गिल आणि कौर (२०१७) यांनी वरिष्ठ माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासाच्या फलितामध्ये असे आढळून आले की माध्यमिक शिक्षकांच्या लिंग भेदानुसार स्थान आणि अध्यापन अनुभवानुसार त्यांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये कोणताही फरक आढळून आला नाही.

अंबरिश आणि अझकिया (२०१६) यांनी तुलनात्मक अभ्यास केला आहे. त्यांनी माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा शिक्षकांच्या लिंग आणि क्षेत्रानुसार अभ्यास केला. त्यांच्या अभ्यासानुसार स्त्री माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी ही पुरुष माध्यमिक शिक्षकांपेक्षा चांगली आहे. क्षेत्रानुसार माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये कोणताही फरक आढळून आला नाही.

रंजूबाला (२०१७) पंजाबमधील राज्यातील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास केला. सदर अभ्यासाचे फलित म्हणजे पुरुष माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी अधिक आहे.

ठोकर (२०१७) यांनी शहरी आणि ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास केला. सरकारी आणि खाजगी शाळांमधील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये त्यांना फरक आढळून आला. खाजगी शाळांतील शिक्षक सरकारी शाळांतील शिक्षकांपेक्षा अधिक वचनबद्ध असलेले आढळून आले. तसेच शहरी माध्यमिक शाळांतील शिक्षक ग्रामीण शाळांतील शिक्षकांपेक्षा अधिक वचनबद्ध आहेत.

खान (२०१५) यांच्या अभ्यासात असे आढळून आले की खाजगी शाळेतील शिक्षक पब्लिक स्कूलमधील शिक्षकांपेक्षा अधिक वचनबद्ध आहेत.

गुवेन ओ (२०१२) यांच्या अभ्यासानुसार खाजगी शाळांमधील शिक्षकांपेक्षा सरकारी शाळांतील शिक्षकांची संस्थानिहाय बांधिलकी अधिक असल्याचे आढळून आले.

शशीकुमार (२०१७) यांनी बी.एड. महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास केला आहे. बी.एड महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या लिंग भेदानुसार आणि संस्थेच्या स्थानानुसार व्यावसायिक बांधिलकीमध्ये कोणताही फरक आढळून आला नाही.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

संबंधित साहित्याच्या पुनरावलोनामध्ये व्यावसायिक बांधिलकी आणि भौगोलिक चलांशी संबंधित संशोधने कमी आढळून आली. पूर्वीच्या संशोधनांमध्ये असलेली विसंगती संशोधकाला संबंधित संशोधने करण्यास प्रवृत्त करते. म्हणून वर्तमान संशोधनाकर्तीने माध्यमिक शिक्षकांच्या भौगोलिक चलांनुसार व्यावसायिक बांधिलकीशी संबंधित संशोधन हाती घेतले.

**अभ्यासाचे महत्व:**

वर्धित क्षमता आणि सुधारित वचनबदधता थेट अध्ययन निष्पत्तींवर परिणाम करतात. व्यावसायिक बांधिलकी असलेला शिक्षक ही त्या संस्थेची संपत्ती असते. शिक्षकांची क्षमता, बांधिलकी या उच्च गुणवत्ता पूर्वक निष्कर्ष मिळविण्यासाठी खूप महत्वाचे घटक आहेत. (गॅरेट, पार्टर, डेसिमोन, बिरमन आणि यून २००१). शिक्षकांची क्षमता, व्यावसायिक बांधिलकी, प्रेरणा आणि समाधान यावर कोणत्याही शिक्षण व्यवस्थेची गुणवत्ता अवलंबून असते. (डार्लिंग हॅमंड, २०००). एखादा प्रभावी आणि क्षमताधारित शिक्षक त्याचे तिथे अध्ययन निष्पत्ती योग्य दिशेने साध्य करु शकेल जेव्हा तो/ती त्याच्या/तिच्या व्यवसायात समाधानी असेल. (सेलेप २०००).

संस्था शैक्षणिक असो या गैर-शैक्षणिक बांधिलकी असणारे शिक्षक सक्रियपणे संस्थेच्या प्रत्येक कार्यात सहभागी होतात. या अभ्यासाची फलिते योग्य प्रकारे राबविल्यास शिक्षकांची बांधिलकी, क्षमता आणि नैतिकता वाढविण्यास मदत होईल. यामुळे शिक्षकांमधील आत्मविश्वास, कार्यक्षमता वाढून दर्जेदार शिक्षण मिळू शकेल.

**उद्दिष्टे:**

१) पुरुष आणि स्त्री माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास करणे.

२) दहा वर्षापेक्षा कमी आणि १० वर्षापेक्षा अधिक अध्यापन अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास करणे.

३) सरकारी आणि खाजगी शाळांमधील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास करणे.

**परिकल्पना:**

१) स्त्री आणि पुरुष माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये लक्षणीय फरक नाही.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

Volume–IX, Issue– IV

July – August 2022

Original Research Article

२) दहा वर्षांपेक्षा कमी अध्यापन अनुभव असलेले माध्यमिक शिक्षण आणि १० वर्षांपेक्षा अधिक अध्यापन अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षक यांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये लक्षणीय फरक नाही.

३) खाजगी आणि सरकारी शाळांमधील स्त्री आणि पुरुष माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये लक्षणीय फरक नाही.

**अभ्यासाच्या मर्यादा:**

१) सदर अभ्यासासाठी बृंहनमुंबईतील फक्त १११ माध्यमिक शिक्षकांची निवड करण्यात आली. सदर संशोधन १११ माध्यमिक शिक्षक पुरते मर्यादित आहे.

२) बृंहनमुंबईतील सरकारी आणि खाजगी शाळांमधील माध्यमिक शिक्षकांपुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

३) सदर संशोधन हे सरकारी आणि खाजगी शाळांमधील स्त्री आणि पुरुष माध्यमिक शिक्षकांपुरते मर्यादित आहे.

४) सदरचा अभ्यास हा फक्त व्यावसायिक बांधिलकी या आश्रयी चलाशी मर्यादित आहे.

५) संबंधित अभ्यास हा सामग्री संकलनासाठी खालील साधनाशी मर्यादित आहे.

रविंदर कौर, सरबजीत कौर राजू आणि सरबजीत कौर ब्रार यांची व्यावसायिक बांधिलकी श्रेणी

**संशोधन पद्धती:**

सदर अभ्यासासाठी वर्णणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. या विभागात संशोधन साधने, नमुना निवड आणि कार्यपद्धती याचा समावेश आहे.

**नमुना निवड:**

सदर अभ्यासासाठी १११ माध्यमिक शिक्षकांची ५८ पुरुष आणि ५३ स्त्री शिक्षिके यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड करण्यात आली. वरील शिक्षक हे बृंहनमुंबईतील खाजगी आणि सरकारी शाळांमध्ये कार्यरत आहेत.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

**संशोधनाची साधने:**

सदर अभ्यासासाठी संशोधनकर्तीने सामग्री संकलनासाठी खालील साधन निवडले. रविंदर कौर, सरबजीत कौर ब्रार यांची व्यावसायिक बांधिलकी श्रेणी. संबंधित प्रश्नावलीमध्ये लिकर्ट पद्धतीने ४५ विधाने दिली गेली त्यामध्ये ५ विभाग होते. अध्ययनकर्ता बांधिलकी (९ विधाने) समाजाशी बांधिलकी (९ विधाने), व्यवसायाशी बांधिलकी (९ विधाने) उत्कर्षासाठी बांधिलकी (९ विधाने) मूलभूत मानवीमूल्यांशी बांधिलकी (९ विधाने) संबंधित प्रश्नावलीमध्ये पंचबिंदूश्रेणीचा उपयोग केला आहे.पूर्णपणे सहमत, सहमत, तटस्थ, असहमत, पूर्णपणे असहमत, सकारात्मक विधानांसाठी भारांश-५,४,३,२,१ तर नकारात्मक विधानांसाठी १,२,३,४,५ असा भारांश दिला आहे. या श्रेणीतील गुणांची बेरीज केली असता ४५ ते २२५ या दरम्यान आहे. उच्च गुण उच्च व्यावसायिक बांधिलकी दर्शवितात तर निम्न गुण निम्न व्यावसायिक बांधिलकी दर्शवितात.

संबंधित श्रेणीचा विश्वसनियता ०.७६ आहे.

**कार्यपद्धती आणि सामग्री संकलन:** बृहनमुंबईतील माध्यमिक शिक्षकांकडून सामग्री संकलन पूर्व परंवानगीने करण्यात आले. व्यावसायिक बांधिलकी श्रेणी शिक्षकांना ऑनलाइन देवून प्रतिसाद नोंदविण्यात आले. संख्याशास्त्रीय साधने वापरुन सामग्री विश्लेषन करण्यात आले.

**सामग्री विश्लेषण:**

सामग्रीचे विश्लेषण मध्यमान आणि प्रमाण विचलन तसेच ‘t‘ परिक्षिकेचा वापर करण्यात आला.

**तक्ता - १ माध्यमिक स्तरावरील पुरुष शिक्षक आणि महिला शिक्षिका यांच्या व्यावसायिक बांधिलकीची तुलना**

| चल | लिंग | | | | ‘t‘ मूल्य (०.०५ level) |
|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक बांधिलकी | पुरुष (५८) | | स्त्री (५३) | | २.७८ |
| | ($M_1$) मध्यमान | S.D प्रमाण विचलन | M2 मध्यमान | S.D प्रमाण विचलन | |
| | १७३.२९ | २०.७१ | १८१.६७ | १९.६९ | |

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal
OPEN ACCESS
VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022
Original Research Article

तक्ता-१ अनुसार पुरुष माध्यमिक शिक्षक आणि स्त्री माध्यमिक शिक्षिका यांचे व्यावसायिक बांधिलकीशी मध्यमान आणि प्रमाण विचलन अनुक्रमे १७३.२९ आणि २०.७१ तसेच १८१.६७ आणि १९.६७ असे आहे. दोन्ही गटांची मध्यमानाची तुलना करुन 't' चे मूल्य २.७८ आले. ते ०.०५ स्तरावर सार्थक आहे. वरील तक्त्यानुसार असे दिसून आले की महिला शिक्षिकांची व्यावसायिक बांधिलकी पुरुष सहकाऱ्यांपेक्षा अधिक आहे. यामागील कारण असे असू शकते की महिला शिक्षिकांना शिक्षिकी व्यवसाय अधिक योग्य आणि आरामदायक वाटतो. महिला शिक्षिका त्यांच्या व्यावसायिक वृद्धिसाठी खूप मेहनत घेतात आणि आपले कार्य प्रभावीपणे करतात. संबंधित अभ्यास हा अंबरिश आणि अझकिया २०१६ आणि रंजू बाला २०१७ यांच्याशी सहमत आहे. शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे. त्यामुळे महिला माध्यमिक शिक्षिकांची व्यावसायिक बांधिलकी त्यांच्या पुरुष सहकाऱ्यांपेक्षा जास्त आहे.

**तक्ता क्र. २ माध्यमिक स्तरावरील अध्यापनाचा अनुभव आणि व्यावसायिक बांधिलकी यामधील तुलना.**

| व्यावसायिक बांधिलकी | N | मध्यमान M | प्रमाण विचलन S.D. | 't' मूल्य गणनेनुसार | 't' मूल्य तालिकेनुसार | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| १० वर्षापेक्षा कमी अनुभव असलेले शिक्षक | ५८ | १८०.६० | १४.४९ | १.४५८ | १.९७७ | ०.०५ |
| १० वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेले शिक्षक | ५३ | १७७.२० | १४.०५ | | | |

अनुभव असलेल्या शिक्षकांचे मध्यमान १८०.६० असून १० वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेल्या शिक्षकांचे मध्यमान १७७.२० आहे. 't' चे गणना केलेले मूल्य १.४५८ असून तक्त्यामधील 't' मूल्यापेक्षा ०.०५ स्तरावर कमी आहे.

म्हणून शून्य परिकल्पना स्वीकारली असून १० वर्षापेक्षा कमी अनुभव असलेले माध्यमिक शिक्षक आणि १० वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेले शिक्षक यांच्या व्यावसायिक बांधिलकी मध्ये फरक आढळून आला नाही. हे फलित गिल आणि कौर (२०१७) यांच्या संशोधनास सहाय्य करते. त्यांच्या अभ्यासामध्ये वरिष्ठ माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमध्ये लिंगानुसार, स्थानानुसार आणि अध्यापन अनुभवानुसार व्यावसायिक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV

JULY – AUGUST 2022

Original Research Article

बांधिलकीमध्ये फरक आढळून आला नाही.

परंतु संबंधित संशोधन अभ्यास पॅन (२०१६) या अभ्यासाचे खंडन करतो. पॅन (२०१६) यांच्या अभ्यासामते ज्या माध्यमिक शिक्षकांचा अध्यापन अनुभव कमी आहे ते अधिक अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांपेक्षा जास्त वचनबद्ध आहेत असे दिसून आले.

**तक्ता क्र. ३ सरकारी आणि खाजगी शाळांमधील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलका तुलना**

| चले | शाळेचा प्रकार | | | | ‘t मूल्य (०.०५ स्तर) |
|---|---|---|---|---|---|
| व्यावसायिक बांधिलकी | सरकारी ५८ | | खाजगी ५३ | | ४.५० |
| | मध्यमान ($M_1$) | प्रमाण विचलन S.D. | मध्यमान (M2) | प्रमाण विचलन S.D. | |
| | १५४.३७ | १६.१७ | १६९.१० | १७.६० | |

तक्ता क्र. ३ अनुसार सरकारी आणि खाजगी शाळांतील माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी चे मध्यमान आणि प्रमाण विचलन अनुक्रमे १५४.३७ आणि १६.१७ तसेच १६९.१० आणि १७.६० आहे. ‘t‘ चे मूल्य दोन्ही मध्यमानांशी तुलना करता ०.०५ स्तरावर ४.५० आहे. वरील तक्त्यानुसार खाजगी शाळांतील माध्यमिक शिक्षक हे जास्त वचनबद्ध दिसून येतात कारण कदाचित त्यांच्या शाळेत कार्य करण्यासाठी आकर्षक वातावरण असेल. त्यामुळे त्यांच्यामध्ये अनुभव व कौशल्यांचा विकास चांगला होत असेल. वरच्या स्तरावरील वचनबद्धता संपादन करण्यासाठी व्यावसायिक विकासाच्या संधी चांगल्या मिळत असतील. संबंधित संशोधनाचा निष्कर्ष ठोकर २०१७ यांच्याशी सहमत आहे. म्हणून शून्य परिकल्पनेचा त्याग केला आहे. सरकारी आणि खाजगी माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकी मध्ये फरक आढळून आला.

**निष्कर्ष:**

१) स्त्री आणि पुरुष माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये फरक आढळून आला.

२) १० वर्षापेक्षा कमी अनुभव आणि १० वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

OPEN ACCESS

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

व्यावसायिक बांधिलकीमध्ये कोणताही फरक आढळून आला नाही.

३) खाजगी शाळांमधील माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी सरकारी माध्यमिक शिक्षकांपेक्षा अधिक आहे.

**समारोप:**

कोणत्याही कामाच्या ठिकाणी सफल होण्यासाठी कर्मचाऱ्यांची व्यावसायिक बांधिलकी आवश्यक आहे कारण त्यांच्या योग्य सादरीकरणावरच सकारात्मक परिणाम दिसून येतात.

एखाद्या कर्मचाऱ्यांची संस्थेशी असलेली बांधिलकी, प्रभावीपणा आणि प्रेरणा संस्थार्गत उत्कर्षासाठी महत्वपूर्ण आहेत. प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास केला आहे. स्त्री आणि पुरुष माध्यमिक शिक्षक सरकारी आणि खाजगी शाळांतील शिक्षक तसेच १० वर्षापेक्षा कमी आणि अधिक अध्यापन अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास केला गेला. स्त्री आणि पुरुष माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये फरक आढळून आला. १० वर्षापेक्षा कमी आणि अधिक अनुभव असलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीमध्ये फरक आढळून आला नाही. खाजगी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांपेक्षा सरकारी माध्यमिक या शाळांमधील शिक्षिकांपेक्षा सरकारी माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी कमी आहे.

यामध्ये असलेल्या मर्यादा सुधारण्यासाठी निश्चितपणे प्रयत्नांची गरज आहे, विशेषतः व्यावसायिक बांधिलकीच्या वैध आणि विश्वासनीय परिमाणांचा विकास करण्यासाठी सदर संशोधनातील निष्कर्ष हे संबंधित साहित्यातील अंतर कमी करण्यासाठी तसेच काही अधिक माहितीसाठी, तसेच शिक्षकांच्या क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरतील.

**संदर्भसूची:**

अंबरिश, के.एस आणि अझकिया (२०१६) ‘‘माध्यमिक शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी लिंग व क्षेत्रानुसार:

तुलनात्मक अभ्यास‘‘, ग्लोबल जर्नल संशोधन विश्लेषण(GJRA) खंड इश्यू-७ पृष्ठ क्र. २६४–२६५

खान एस (२०१५) ‘‘खाजगी आणि पब्लिक स्कूल मधील शिक्षकांची संस्थानिहाय बांधिलकी‘‘ भारतीय

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, ISSUE– IV JULY – AUGUST 2022

Original Research Article

मानसशास्त्रीय आंतरराष्ट्रीय जर्नल खंड २ क्र.३ पृष्ठ क्र.१७–१९.

पॅन (२०१६) ''पश्चिम बंगालमधील स्वयं वित्त संचालित बी.एड महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा अभ्यास'' द स्कॉलर खंड १ इश्यू-२ पृष्ठ क्र. २०–२८

रंजू बी (२०१७) पंजाबमधील राज्यातील शालेय शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी. स्कॉलरची रिसर्ज फॉर ह्युमॅनिटी

सायन्स ॲंड इंग्लिश लॅंग्वेज खंड -४ इश्यू-२२ पृष्ठ क्र. ५३९३–५३९८

शशीकुमार एस. (२०१७) बी.एड महाविद्यालयातील प्राध्यापकांची व्यावसायिक बांधिलकी. अभिनव विद्यालय मंथली रेफ्रीड जर्नल ऑफ रिसर्च इन मॅनेजमेंट ॲंड टेक्नॉलॉजी खंड -६ इश्यू-७ पृष्ठ क्र. १३–१७

ठोकर ए.ए. (२०१७) शहरी आणि ग्रामीण विभागातील सरकारी आणि खाजगी शाळांतील शिक्षकांची व्यावसायिक बांधिलकी. मानवता, सामाजिक शास्त्र आणि शिक्षण-आंतरराष्ट्रीय जर्नल खंड -४ इश्यू-६ पृष्ठ क्र. ९५-१०३

*Cite This Article:*

***श्रीमती प्रतिभा उरसळ व **डॉ.चेतन चव्हाण** (२०२२). माध्यमिक शिक्षकांच्या व्यावसायिक बांधिलकीचा भौगोलिक चलांच्या संदर्भात अभ्यास, ***Educreator Research Journal, Volume–IX, Issue– IV,*** *July – August 2022, 130-140.*